# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली–४१५ ७१२ जिल्हा रत्नागिरी
## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

जा.क्र.मसंकें/प्रअपां/ ठेका/४०१/ /२०२२ दिनांक २९.९.२२

## आंबा बागा साफसफाई करणेच्या निविदा सूचना

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी अंतर्गत असलेल्या पांगारी विभागातील आंबा बागेतील तोडलेला कुजण्यायोग्य पाला पाचोळा गोळा करणे, गोळा केलेला कुजण्यायोग्य पालापाचोळा कंपोस्ट खड्डयांमध्ये टेवने. आंबा झाडांवरील बांडगुळे, ऑर्कीड सारखी परजिवी वनस्पती, वेली व सुकालेल्या तसेच वांझ फांद्या कापून काढून मोकळया जागेमध्ये तोडून चेपून टेवणे , झाडे लावणेसाठी खड्डे खोदणे,, आंबा झाडांखाली नांगरट करणे, झाडांना रिंगा खोदणे आदी कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कामाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहून कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती मजुर/प्रती झाड मजुरी दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमंतीपत्र या कार्यालयात दिनांक १४.१०.२०२२ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"पांगारी विभागाअंतर्गत कंत्राटी कामे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. ज्या ठेकेदाराचे दरपत्रक मंजुर होईल त्या ठेकेदाराने कामाचे आदेश मिळताच रु.१0000/- मात्र रकमेचा धनादेश " डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिट" या नावे काढून अनामत रक्कम म्हणुन द्यावयाचा आहे. या कार्यालयाच्या अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

सही/-

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.